# राष्ट्रीय सेवा योजना (NSS) वार्षिक वृत्तांत २०२५-२६

विशेष उल्लेखनीय कार्यक्रम/उपक्रम:
२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आले, त्यापैकी ३ वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

१) विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबीर:
या संपूर्ण वर्षातील सर्वात महत्वाचा आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा उपक्रम म्हणजे दौंडकरवाडी येथे १५ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित केलेले 'विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबीर' होय. सलग सात दिवस चाललेल्या या निवासी शिबिरात स्वयंसेवकांनी गाव दत्तक घेऊन बंधारे बांधणी, ग्रामस्वच्छता, एक मिळकत एक झाड या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण केले आणि ग्रामस्थांसाठी विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवले, यात २०० स्वयंसेवक व २५ शिक्षक सहभागी झाले होते. या शिबिराने विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने ग्रामीण भारताची ओळख करून दिली आणि श्रमाचे महत्त्व शिकवले.

२) रक्तदान आणि आरोग्य शिबिरे:
सामाजिक आरोग्याप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने २४ सप्टेंबर २०२५ रोजी (राष्ट्रीय सेवा योजना दिन) आणि २ जानेवारी २०२६ रोजी असे दोन भव्य 'रक्तदान शिबीर' आयोजित केले, ज्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याचबरोबर २४ सप्टेंबरला मोफत दंत तपासणी शिबीरही घेण्यात आले.

३) राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील विशेष कामगिरी:
राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले.
११ ते १७ फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय एकात्मता शिबिरात (NIC - National Integration Camp) विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
१७ ते २४ जानेवारी दरम्यान 'आव्हान' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग होता.
५ ते ७ मार्च दरम्यान पार पडलेल्या तीन दिवसीय 'आदिवासी कला संस्कृती संवर्धन कार्यशाळा' आणि संगमनेर येथील 'शेती व्यवस्थापन कार्यशाळा' या ठिकाणी विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरीचा ठसा उमटवला.

४) 'संविधान जागृती' एक दिवसीय कार्यशाळा: भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाचे (७५ वर्षे) औचित्य साधून १३ मार्च २०२६ रोजी 'संविधान जागृती' या विषयावर एका विशेष एक दिवसीय कार्यशाळेचे अत्यंत उत्साहात आणि दिमाखात आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री विनायकजी आंबेकर आणि निरीक्षक मा. श्री कृष्णा भंडलकर आले होते, संविधानातील मूल्यांची आजच्या युवा पिढीत, विशेषतः राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये रुजवणूक करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

५) शैक्षणिक, सामाजिक, क्रीडाविषयक, सांस्कृतिक वाटचाल:
सामाजिक वाटचाल: जुलै २०२५ ते मार्च २०२६ या काळात ५५ हून अधिक उपक्रम राबवण्यात आले. यात 'स्वच्छता ही सेवा' (१४ ऑगस्ट व २५ सप्टेंबर), 'मेरी माटी मेरा देश' (१२ सप्टेंबर), आणि 'नदी स्वच्छता अभियान' (३० नोव्हेंबर) यांचा समावेश होता. पैठण येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना १३

नोव्हेंबर रोजी मदत केली. दिव्यांग मतदारांना १५ जानेवारीला मतदानात साहाय्य केले. तसेच, १५ ऑक्टोबरला 'व्यसनमुक्ती मेळावा' आयोजित करण्यात आला.

शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचाल:

'वाचन प्रेरणा दिन' (१५ ऑक्टोबर), 'शांतता पुणेकर वाचत आहेत' (९ डिसेंबर) आणि 'मराठी भाषा गौरव दिवस' (२७ फेब्रुवारी) यांतून वाचन संस्कृती आणि साहित्यिक मूल्ये जोपासली गेली.

'सृजनरंग' (४ सप्टेंबर) आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन यात विद्यार्थ्यांचा सहभाग (२३ सप्टेंबर) यांतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला.

क्रीडा व आरोग्यविषयक वाटचाल: विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी १९ व २३ जानेवारीला 'पुणे सायकल ग्रांड टूर' मध्ये सहभाग घेतला, आणि २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान तीन दिवसीय 'ताणतणाव  व्यवस्थापन व व्यसनमुक्ती कार्यशाळा' आयोजित करून विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सर्वांगीण विकासावर भर दिला गेला.

हे सर्व उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास रामचंद्र उगले, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. किसन कुमरे, प्रा. मधुकर वाळुंज व डॉ. शितल शेवते तसेच सर्व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.


UNIT - A004
SERVICE SCHEME




VICE SCHEME




म. ए. सो.
आबासाहेब गरवारे महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना
'सृजनरंग' सांस्कृतिक व साहित्यिक
स्पर्धा
काव्यवाचन, निबंध, वक्तृत्व, भित्तीचित्र
04/09/2025
Maharashtra Education Society's
ABASAHEB GARWARE COLLEGE (AUTONOMOUS)
Karve Road, Pune - 411004
UNIT - A004
NATIONAL SERVICE SCHEME
राष्ट्रीय सेवा योजना


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना
आबासाहेब गरवारे महाविद्यालय (स्वायत्त), कर्वे रोड, पुणे ४११ ००४.




Maharashtra Education Society's
UNIT - A004
ida
INDIAN DENTAL ASSOCIATION PUNE BRANCH
CDH ACTIVITY
2025-2026
President
Dr Manjiri Joshi